# Press Note

४ जानेवारी २०१४

## नागरिकांच्या २०१२-१३ च्या "वाहतूक सद्यस्थिती अहवाला"मधून सार्वजनिक वाहतुकीचा तसेच बिगरयांत्रिक वाहतुकीचा हिस्सा वाढवण्याची गरज स्पष्ट

वाहतूक सुधारणांबाबत कार्यरत असलेल्या "परिसर" आणि "सेव्ह पुणे ट्राफिक मूव्हमेंट" ह्या स्वयंसेवी संस्थांनी पुण्याच्या वाहतुकीबाबत २०१२-१३ ह्या वर्षासाठी "नागरिकांचा वाहतूक सद्यस्थिती अहवाल" आज प्रसिद्ध केला. भारतातील हा अशा प्रकारचा पहिलाच अहवाल असावा. ह्या अहवालाची संकल्पना पुणे मनपा दरवर्षी प्रसिद्ध करीत असलेल्या "पर्यावरण सद्यस्थिती अहवाला"वरून घेतलेली आहे. पुण्याच्या वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी कोणते प्रकल्प हाती घ्यावेत तसेच कोणते घेऊ नयेत ते ठरवण्यासाठी ह्या अहवालाचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे. त्यामुळे पुण्याची वाहतूक अधिक शाश्वत, सुरक्षित तसेच समाजातील सर्व घटकांना सोयीची होईल.

ह्या अहवालामध्ये वाहतुकीची सद्यस्थिती मांडण्यासाठी ९ महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास करून त्यांना गुण दिलेले आहेत. हे गुण अधिकृत आकडेवारी तसेच सर्वेक्षणावर आधारित आहेत. हे ९ घटक तसेच गुण ठरवण्याची पद्धत पुणे मनपा ने प्रसिद्ध केलेला पुण्याचा सर्वंकष वाहतूक आराखडा (२००८) आणि केंद्र सरकारच्या नगरविकास मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या नागरी वाहतुकीच्या मापदंडांनुसार आहे.

ह्या ९ घटकांमध्ये विविध वाहतूक साधनांचा हिस्सा, सायकलींसाठी सोयी आणि प्रमुख रस्त्यांवर पार्किंग होणे ह्या ३ घटकांमध्ये शहराला बरेच कमी गुण मिळाले आहेत. सुरक्षितता, पादचारी सुविधा, सार्वजनिक वाहतुकीची गुणवत्ता आणि जनमत ह्या ४ घटकांमध्ये मध्यम, तर प्रवासाला लागणारा वेळ आणि प्रदूषण ह्याबाबत बऱ्यापैकी गुण मिळाले आहेत.

ह्यापैकी "विविध वाहतूक साधनांचा हिस्सा" ह्या घटकासाठी पुण्यातील सुमारे ३,६०० नागरिकांचे विस्तृत सर्वेक्षण केले गेले. त्यामध्ये अनेक प्रकारची उद्बोधक माहिती समोर आलेली आहे. ह्या सर्वेक्षणात असे दिसले, की पुण्यातील खाजगी वाहनांचा वापर ४७% (३५% दुचाकी, १२% चारचाकी) इतका वाढला आहे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर १९% हून खाली आला आहे, ज्यामध्ये पीएमपीएमएल आणि रिक्षांचा हिस्सा प्रत्येकी ८% तर उरलेला इतर बसेसचा आहे. एकेकाळी "सायकलचे शहर" असलेल्या पुण्यात सायकलचा वापर अवघ्या ५% वर आला आहे.

एकूणच, सार्वजनिक वाहतुकीचा खालावलेला हिस्सा आणि बिगरयांत्रिक वाहतुकीच्या (सायकल व चालणे) अत्यंत अपुऱ्या सुविधा ह्यामुळे शहराला बरेच कमी गुण मिळाले आहेत.

"सेव्ह पुणे ट्राफिक मूव्हमेंट"चे जयंत जोशी ह्यांनी असे नमूद केले, की ह्या अहवालाचा प्रमुख उद्देश आपल्या शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या सद्यस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी आकड्यांमध्ये व्यक्त होईल असा मापदंड निर्माण करणे हा आहे. ह्या अहवालात सदर ९ घटकांना मिळालेले गुण त्यांची आजची परिस्थिती दाखवत असले, तरी त्या गुणांचा कल पुढील वर्षांमध्ये कसा राहतो ते पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या शहराची वाहतूक सुधारते आहे का हे नागरिकांना तसेच संबंधित अधिकाऱ्यांना ह्या कलाद्वारे कळून येईल. ह्या वर्षाचा अहवाल त्यासाठी एक आधाररेषा निश्चित करतो.

"परिसर" चे रणजित गाडगीळ म्हणाले की जगातील अनेक शहरे असा अहवाल प्रसिद्ध करतात, आणि खरे तर अशा प्रकारचा अहवाल पुणे मनपा ने दरवर्षी पुण्याचा अधिकृत अहवाल म्हणून प्रसिद्ध करायला हवा. परंतु तोवर नागरिकांच्या ह्या अहवालामुळे ही गरज पूर्ण होऊ शकते. श्री. गाडगीळ ह्यांनी पुणे मनपा ने मुख्यत्वे खाजगी वाहनांची वाहतूक सुरळीत राहावी म्हणून तुकड्यातुकड्यांनी प्रकल्प करण्यापेक्षा सर्वंकष वाहतूक आराखड्यानुसारच वाहतूक उपाययोजना कराव्यात असे मत आग्रहाने मांडले. सध्या ज्या पद्धतीने आणि ज्या प्रकारचे वाहतूक प्रकल्प येत आहेत तीच पद्धत चालू राहिल्यास पुणे शहराची वाहतूक व्यवस्था ही ह्याहूनही भयानक वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि वाढते अपघात

ह्यांमुळे संपूर्ण मोडकळीला येईलच, शिवाय त्या उपाययोजनांसाठी करदात्यांचा अतोनात पैसाही खर्च झालेला असेल असेही ते म्हणाले.

हा सविस्तर अहवाल, तसेच त्यासाठी वापरलेली माहिती http://tsrpune.wikispaces.com ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## दृष्टिक्षेपात वाहतूक सद्यस्थिती अहवाल

| | घटक | १०० पैकी गुण | माहितीचा स्रोत |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षितता | ४० | पुणे वाहतूक पोलीस |
| २ | विविध वाहतूक साधनांचा हिस्सा | २७ | घरोघरचे सर्वेक्षण |
| ३ | पादचारी सुविधा | ३७ | सर्वेक्षण |
| ४ | सार्वजनिक वाहतुकीची गुणवत्ता | ५९ | पीएमपीएमएल, सर्वेक्षण |
| ५ | सायकलींसाठी सुविधा | १० | पुणे मनपा, सर्वेक्षण |
| ६ | प्रवासास लागणारा वेळ | ७५ | सर्वेक्षण |
| ७ | प्रदूषण | ६० | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| ८ | प्रमुख रस्त्यांचा वापर पार्किंगसाठी | २० | पुणे मनपा, सर्वेक्षण |
| ९ | जनमत | ४१ | घरोघरचे सर्वेक्षण |

जयंत जोशी, "सेव्ह पुणे ट्राफिक मूव्हमेंट"

jayant.joshi@savepunetraffic.org

**Ph**: 73879 00020

रणजित गाडगीळ, "परिसर"

ranjit@parisar.org

**Ph**: 88050 27186

# Press Note

04th January 2014

## Citizens' Transportation Status Report 2013 reveals need to increase share of public and non-motorized transport

In a first of its kind, city-based NGOs Parisar and Save Pune Traffic Movement (SPTM) have released a Citizens' Transportation Status Report (TSR) on the lines of the Environment Status Report (ESR) that is published every year by the Pune Municipal Corporation. The TSR is intended as a tool to help officials decide what sort of projects are needed as well as what sort of projects should be avoided in order to improve the city's transportation and make it more sustainable and safe while providing mobility to everyone. The Citizens' TSR considers 9 important parameters that indicate the health of the transportation system in the city and calculates a value for each parameter based on either official data or data that was gathered by conducting surveys. The parameters were chosen from the Comprehensive Mobility Plan 2008 published by the PMC and the Service Level Benchmarks for Urban Transport published by the Ministry for Urban Development, Government of India.

Out of the 9 parameters, Pune transport system fared poorly regarding 3 parameters (modal share, cycling infrastructure, arterial roads used for parking), scored at medium level regarding 4 parameters (safety, pedestrian infrastructure, public transport quality and public satisfaction) and scored at an acceptable level regarding 2 parameters (travel time and pollution).

A detailed household survey of 3600 individuals, conducted to determine the modal shares, revealed that the modal share of personal vehicles has reached 47% (35% two-wheelers, 12% cars). The public transport share is less than 19%, with the share of PMPML and auto-rickshaws almost the same (8%) and the rest taken by other buses. The modal share of cycling has dropped to just 5% in this erstwhile "bicycle city".

In general, the sinking share of public transportation and dismal facilities for non-motorized modes (cycling and walking) have been the main reasons for low scores.

Jayant Joshi of SPTM emphasized that the main focus of the report is to establish fixed and quantifiable parameters that help us to gauge the health of the overall transport system of the city. While the absolute value of each parameter indicates current status, more critical would be the trend in the years to come. The trend will help citizens, policy makers and the administration to determine if the policy decisions and investments made by the city are moving us in the right direction. The report for 2013 thus establishes a baseline.

Ranjit Gadgil of Parisar said that many cities in the world publish such a report annually and a TSR should ideally be published officially by the PMC; but until then a Citizens' TSR would fill the gap. He stressed the need for the city to implement the Comprehensive Mobility Plan rather than ad hoc implementation of projects that are aimed primarily at moving personal vehicles and warned that the current trend would be unsustainable, leading to more congestion, pollution and accidents, while becoming a drain on public funds.

The detailed report as well as the data collected for the report is available at http://tsrpune.wikispaces.com.

## Results at a glance

| | Indicator | Score (max 100) | Source |
|---|---|---|---|
| **1** | Safety | 40 | Data from Pune Traffic Police |
| **2** | Modal Share | 27 | Household Survey |
| **3** | Pedestrian Infrastructure | 37 | Survey |
| **4** | Public Transport Quality | 59 | Data from PMPML and Survey |
| **5** | Cycling Infrastructure | 10 | Data from PMC and Survey |
| **6** | Travel Time | 75 | Survey |
| **7** | Pollution | 60 | Data from MPCB |
| **8** | Arterial roads used for parking | 20 | Data from PMC and Survey |
| **9** | Public Satisfaction Index | 41 | Household Survey |

Jayant Joshi, *Save Traffic Pune Movement*
jayant.joshi@savepunetraffic.org
**Ph**: 73879 00020

Ranjit Gadgil, *Parisar*
ranjit@parisar.org
**Ph**: 88050 27186